नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०३/०७/२०२६ (शुक्रवार )

# चिल्ड्रेन्स बँक ऑफ इंडिया असे छापील ८ कोटी ६५ लाख अंकित किंमतीच्या बनावट नोटांच्या बंडलांच्या माध्यमातून फसवणूक करणारे २ आरोपी अटक, एकुण ३ लाख ४८ हजार ६०० रूपयांचा मुद्देमाल जप्त स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पोलीस निरीक्षक श्री. अंकुश माने यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नागरिकांची फसवणूक करण्याच्या उद्देशाने 'चिल्ड्रेन्स बँक ऑफ इंडिया' असे छापील बनावट नोटांचे बंडल मूळ भारतीय चलनी नोटा असल्याचे भासवून फसवणूक करणाच्या तयारीत असाणाऱ्या दोन आरोपींना अटक केली.**

दिनांक ०२/०७/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनिय माहीती मिळाली की, दोन इसम पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट कार क्र. एम एच २९ बी सी ४८६५ मधून नागपूर ते वर्धा राष्ट्रीय महामार्गावर येऊन 'चिल्ड्रेन्स बँक ऑफ इंडिया' असे छापील नोटांचे बंडल मूळ चलनी नोटा असल्याचे भासवून नागरिकांची फसवणूक करण्याच्या उद्देशाने फिरत आहेत. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचांसमक्ष आसोला ते सावंगी परिसरात सापळा रचुन नाकाबंदी केली. नाकाबंदी दरम्यान स्विफ्ट कार क्र. एम एच २९ बी सी ४८६५ संशयित वाहन येताना दिसले असता वाहन थांबण्याचा इशारा केला असता चालकाने वाहन न थांबवता भरधाव वेगाने पळ काढला. पोलिसांनी तत्काळ पाठलाग करून

वाहन थांबविले. **आरोपी अफरोज खान जमीरउल्ला खान, वय ४३ वर्षे, रा. मेमन कॉलनी, यवतमाळ आणि इरशाद जुम्मन शेख, वय २६ वर्षे, रा. देवळी, जि. वर्धा हे २ आरोपी मिळुन आले.** पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यात चिल्ड्रेन्स बँक ऑफ इंडिया असे छापील ५००, २०० व १०० मूल्याच्या बनावट नोटांचे एकूण २,३०० बंडल आढळून आले. त्यामध्ये ५०० चे १,५०० बंडल (अंकित किंमत ७ कोटी ५० लाख), २०० चे ३५० बंडल (अंकित किंमत ७० लाख) तसेच १०० चे ४५० बंडल (अंकित किंमत ४५ लाख) असा एकूण ८ कोटी ६५ लाख अंकित किंमतीचा बनावट चलनसदृश मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर बनावट बंडलांपैकी काही बंडलांच्या वरच्या बाजूस मूळ भारतीय चलनी नोटा लावून ते खरे नोटांचे बंडल असल्याचा भास निर्माण करून नागरिकांची फसवणूक करण्याचा आरोपींचा हेतू असल्याचे प्राथमिक तपासात दिसुन आले आहे.

**पोलीसांनी पंचासमक्ष १) चिल्ड्रेन्स बँक ऑफ इंडिया असे छापील ५००, २०० व १०० मूल्याच्या बनावट नोटांचे एकूण २,३०० बंडल प्रति बंडल ३०/—रूपये एकुण किंमती ६९,०००/— रूपये २) मूळ भारतीय चलनी नोटा ५,६००/—रूपये, ३) स्विफ्ट कार क्र. एम एच २९ बी सी ४८६५ किंमती २,५०,०००/—रूपये, ४) चार मोबाईल फोन किंमती २४,०००/—रूपये एकूण किंमती ३,४८,६००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर प्रकरणात बुटीबोरी पोलीस स्टेशन येथे कलम ३१८(२),२१८,३(५), भान्यासं सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपींनी अशाच प्रकारे इतर ठिकाणीही फसवणूक केली आहे का, याचा सखोल तपास नागपुर ग्रामीण पोलीस करीत आहे.**




SAMSUNG

# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द ३ गुन्हे नोंद, १ कोटी २१ लाख ५६ हजरांचा मुद्देमाल जप्त भिवापुर पोलीस यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापुर** :— दिनांक ०२/०७/२०२६ रोजी भिवापुर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मौजा भगवानपुर बकरजवळ नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान वाहन क्रं १) एलपी १६ चक्का ट्रक क्रमांक एम एच १२ एस एफ ५५७७ २) एलपी १६ चक्का ट्रक क्रमांक एम एच १२ एस एफ ४४७७ आणि ३) एलपी १६ चक्का ट्रक एम एच ४० सी एम ६५९७ मिळून आल्याने नमुद तिन्ही वाहनांची पंचासमक्ष तपासणी केली असता त्यामध्ये रेती असल्याचे आढळून आले. नमुद वाहन चालकांना रेती परवान्याबाबत विचारणा केली असता त्यांच्याकडे असलेल्या रेती परवान्यात नमुद तसेच विहित क्षमतेपेक्षा अधिक रेतीची वाहतूक करत असल्याचा संशय निर्माण झाल्याने सदर वाहनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्रव्यवहार करून सदर वाहनाचे वजन करण्यात आले. तपासणीनंतर नमुद तिन्ही वाहनात परवान्यापेक्षा अतिरिक्त रेती तसेच विहीत क्षमतेपेक्षा अतिरिक्त रेती असल्याचे निष्पन्न झाले. वाहन क्रं १) एलपी १६ चक्का ट्रक क्रमांक एम एच १२ एस एफ ५५७७ मध्ये परवान्यापेक्षा २.९८ ब्रास रेती अतिरीक्त मिळुन आली. वाहन क्रं २) एलपी १६ चक्का ट्रक क्रमांक एम एच १२ एस एफ ४४७७ मध्ये परवान्यापेक्षा ३.७० ब्रास रेती अतिरीक्त मिळुन आली.तसेच वाहन क्रं ३) एलपी १६ चक्का ट्रक एम एच ४० सी एम ६५९७ मध्ये परवान्यापेक्षा १.८६ ब्रास रेती अतिरीक्त मिळुन आली.

**पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद तिन्ही वाहन आणि ३१.५४ ब्रास रेती असा एकुण किंमती १,२१,५६,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. सदर प्रकरणी वाहन क्र. १) चा चालक सय्यद जावेद सय्यद साबीर, रा. अमरावती व वाहन क्र. २) चा चालक सय्यद जमीर सय्यद वजीर, रा. अमरावती असून, वाहन क्रं १ आणि २ या दोन्ही वाहनांचा मालक मोहम्मद शेख अब्दुल रझाक, रा. छाया नगर, अमरावती आणि वाहन क्रं ३) चा चालक**

सय्यद अकील सय्यद सिद्दीक, रा. अमरावती यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन भिवापुर येथे कलम ३०३(२), ४९, ३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलऊम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम, सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये प्रत्येकी १ असे ३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.



# ३५.४२५ किलो प्रतिबंधीत सुंगधीत तंबाखु सह दुचाकी वाहन असा एकुण ६२ हजार ९८० रूपयांचा मुद्देमाल जप्त, आरोपी अटक नरखेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड** :– दिनांक ०१/०७/२०२६ रोजी रात्री नरखेड पोलीसांना गोपनिय माहिती मिळाली की, महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु ची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे नरखेड पोलीसांनी सावरगाव ते काटोल रोड येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान होन्डा शाईन मोटार सायकल क्र.एम.एच ४० बि.वाय. १६७१ मिळुन आली. पोलीसांनी पंचासमक्ष तपासणी केली असता महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. **नमुद वाहन चालक आरोपी नामे मयुर शंकरलाल सचदेव, वय २७ वर्ष, रा. दयाल नगर, वार्ड नं. १०, ता. जि वर्धा हा मिळुन आला.**

**पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष ३५.४२५ किलोग्रॅम प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु साठा किंमती २२,९८० /–रूपये आणि होन्डा शाईन मोटार सायकल क्र.एम.एच ४० बि. वाय. १६७१ किंमती ४०,००० /–रूपये असा एकुण ६२,९८०/–रूपयांचा मुद्देमाल केला आहे. नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा करून वाहतुक केली. नमुद आरोपी विरूद्ध पोस्टे नरखेड येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २२३,२७४, २७५ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे.**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने